# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १८/०७/२०२४ (गुरूवार) सायंकाळ**

---

## अनैतीक देहव्यापार करण्यास प्रवृत्त करणारे आरोपी गजाआड
## अनैतीक मानवी वाहतुक प्रतीबंधक कक्ष, नागपुर ग्रामीण यांची कारवाई

मा. पोलीस अधिक्षक साहेब नागपूर ग्रामीण हयांचे आदेशाने अनैतीक मानवी वाहतुक प्रतीबंधक कक्ष, नागपुर ग्रामीण यांचे पथकानी गोपनीय माहीतीच्या अनुषंगाने पोलीस ठाणे वेलतुर परीसरातील मौजा आंभोरा येथील यु ॲन्ड मी लॉजींग आणि बोर्डीग रेस्टॉरेन्ट मध्ये अवैधरित्या चालत असलेल्या कुंटनखान्यावर रेड करून एक अल्पवयीन १६ वर्षीय पिडीत बालीका रेस्क्यू करण्यात आली.

यातील दलाल **आरोपी नामे विजय प्रल्हाद मेश्राम, वय ३६ वर्ष, रा. गोन्हा, तह. कुशी, जिल्हा—नागपुर** हा देहव्यापाराकरीता अल्पवयीन मुली तसेच महीलांना व ग्राहकांना कस्टमरला पुरवून ओळखीच्या वेगवेगळया ठिकाणी लॉजेस मालकांच्या संमतीने जागा उपलब्ध करतो व स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता मुलींना पैशाचे आमिष देवुन देहव्यापारास प्रवृत्त करून आणि लोकांकडुन कमीशन घेतो व चोरीलपीने अवैधरित्या कुंटनखाना चालवुन देहव्यापार करीत असतो.

दिनांक १७/०७/२०२४ रोजी सुद्धा यातील दलाल आरोपी विजय मेश्राम याने नेहमीप्रमाणे आपले ओळखीचा सागर चंद्रशेखर कुर्जेकार रा. वेलतुर याचे मालकीचे आंभोरा येथील हॉटेल यु ॲन्ड मी लॉजीग बोर्डीग रेस्टारेन्ट मध्ये अल्पवयीन १६ वर्षीय मुलीला व ग्राहकाला नेवुन जागा उपलब्ध करून दिली. सदरवेळी हॉटेल मालक सागर कुर्जेकार हा सुद्धा हजर होता. आरोपी क्र. १) विजय मेश्राम आणि आरोपी क्र. २) सागर कुर्जेकार यांनी दोघांनी संगणमतानी स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता मुलींना पैशाचे आमिष देवुन देहव्यापारास प्रवृत्त करून आणि लोकांकडुन कमीशन घेवुन जागा उपलब्ध करून दिली व चोरीलपीने अवैधरित्या कुंटनखाना चालवून देहव्यापार करतांना आढळुन आले. अशा पद्धतीने दोन्ही आरोपीतांनी संगणमतानी आपले स्वत:चे आर्थीक फायद्याकरीता कुंटनखाना चालवित असल्याचे माहीतीवरून पोलीस निरीक्षक जयपालसिंह गिरासे व त्यांचे पथक अनैतीक मानवी वाहतुक प्रतीबंधक कक्ष, नागपुर ग्रामीण यांनी कायदेशीर सापळा रचुन रेड केली. पोलीस ठाणे वेलतुर येथे अप. क्र. ११४/२०२४ कलम ३, ४, ५ अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम—१९५६, सहकलम १४३, ३(५) बि.एन.एस.—२०२४, सहकलम १७ पोक्सो—२०१२, सहकलम ४, ५ जुवेनाईल जस्टीज कायदा—२०१५ (मुलांच्या सरंक्षणाची काळजी) अन्वये गुन्हा नोंद करून दोन पुरूष आरोपीतांना अटक करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस ठाणे वेलतुर प्रभारी करीत आहे.

सदर कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ तसेच मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पुजा गायकवाड यांचे मार्गदर्शनात अनैतीक मानवी वाहतुक प्रतीबंधक कक्ष, नागपुर ग्रामीण येथील पोनि जयपालसिंह गिरासे व त्यांचे पथक मपोहवा ज्योती वानखेडे, मपोहवा अर्चना कांबळे, पोहवा ललीत उईके, चापोहवा मनोज मेंढुले यांनी केलेली आहे.

पोलीस माहिति कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर